माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०५५/२०१८
दि.०६/०४/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.सोहेल मु. खान, ................अपिलार्थी
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विधी अधिकारी, विधी विभाग

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडे दि.०३/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) आपले सरकार पोर्टल तक्रार क्र.DEPT/URDM/2017/6106 या नमुद संदर्भाधीन दिनांक ०१/०२/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. नमुद बैठकीबाबत तपशिलवार माहिती उपलब्ध करुन मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत आजपर्यंत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२६/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०६/०४/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./२६२/२०१८ दि.०४/०४/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.
सबब, जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०३/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

O/C
09/04/18.

२) जन माहिती अधिकारी तथा
विधी अधिकारी, विधी विभाग

9/4/18

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी) यांचे कार्यालय.